# नमुना दोन

**नाशिक जिल्हा परिषद नाशिक**
शिक्षण विभाग (प्राथमिक)
जा.क्र./शिक्षण/प्राथ-८/ ८४ /२०२५
नाशिक, दिनांक ०५/१०/२०२५

**व्यवस्थापक :-**

**विषय- बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ यांच्या कलम १८ च्या प्रयोजनार्थ बालकांना मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम, २०११ याच्या नियम११, पोट नियम ४ अन्वये शाळांना मान्यता प्रमाणपत्र देण्याबाबत ...**

महोदय,

आपल्या दिनांक १२.०८.२०२५ च्या अर्जाच्या संदर्भात आणि त्यानंतर यासंदर्भात शाळेशी केलेला पत्रव्यवहार शाळेचे तपासणी याआधारे मी. **शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद नाशिक, दिनांक** १.०४.२०२५ ते ३१.०३.२०२८ पर्यंत तीन वर्षाच्या कालावधी साठी **इयत्ता १ ली ते ८ वी करिता- लिटल एंजल स्कूल मालेगाव ता.मालेगाव जि.नाशिक** शाळेचे नांव, पत्या सह शाळेस तात्पुरती मान्यता देत आहे.

**वरील मान्यता ही खालील शर्तीच्या पूर्ततेच्या अधीन आहे :-**

१. मान्यतेचा कलावधी वाढवून मिळणार नाही आणि इयत्ता आठवीनंतर मान्यता किंवा संलग्नता देण्यात कोणत्याही परिस्थितीत कोणतेही बंधन नसेल.
२. बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिनियम, २००९ (जोडपत्र एक) आणि महाराष्ट्र बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, २०११ (जोडपत्र दोन) मधील तरतुदीचे, शाळा पालन करेल
३. शाळा नजीकच्या दुर्बल घटकातील आणि वंचित गटातील बालकांना , पहिल्या इयत्तेत, त्या इयत्तेतील विद्यार्थी संख्येच्या किमान २५% मर्यादेपर्यंत प्रवेश देईल आणि प्राथमिक शिक्षण होईपर्यंत त्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण देईल परंतु आणखी असे की, पूर्व प्राथमिक इयत्तांच्या बाबतीतदेखील या प्रमाणकाचे अनुपालन करण्यात येईल.
४. परिच्छेत ३ मध्ये निर्दिष्ट केलेल्या बालकांकरीता शाळेला अधिनियमाच्या कलम १२ (२) नुसार प्रतिपूर्ती मिळेल. अशी प्रतिपूर्ती मिळण्यासाठी शाळेला बँक खाते देण्यात येईल.
५. संस्था/शाळा कोणतीही कॅपिटेशन फी वसूल करणार नाही आणि कोणत्याही छाननी पद्धतीसाठी बालकांम किंवा त्याच्या किंवा तिच्या मात्या-पित्यास किंवा पालकास भाग पाडणार नाही.
६. कोणत्याही बालकास वयाच्या पुराव्याच्या अभावी धर्म, जात किंवा वंश, जन्मठिकाण किंवा यांपैकी कोणत्याही कारणास्तव, शाळेमध्ये प्रवेश नाकरण्यात येणार नाही.
७. (एक) शाळेत प्रवेश दिलेल्या कोणत्याही बालकास तो त्या इयत्तेत असेल त्याच इयत्तेत रोखून ठेवले जाणार नाही किंवा प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत शाळेतून काढून टाकण्यात येणार नाही.

(दोन) कोणत्याही बालकास शरीरिक शिक्षा किंवा मानसिक त्रास देण्यात येणार नाही.

(तीन) कोणत्याही बालकास प्राथमिक शिक्षण हाईपर्यंत कोणत्याही मंडळाची परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असणार नाही.

(चार) प्राथमिक शिक्षणपूर्ण केलेल्या प्रत्येक बालकास, नियम २३ अन्वये निर्धारित केलेले प्रमाणपत्र देण्यात येईल.

(पाच) विकलांग/विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांचा अधिनियमाच्या तरतुदींनुसार समावेश करण्यात येईल.

(सहा) अधिनियमाच्या कलम २३ (१) अन्वये निर्धारित केलेली किमान अर्हता धारण करणाऱ्या शिक्षकांची नियुक्ती करण्यात येईल.परंतु आणखी असे की, अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास किमान अर्हता धार न करणाऱ्या शिक्षकांना अशी किमान अर्हता ५ वर्षांच्या कालावधीत संपादित करावी लागेल.

(सात) अधिनियमाच्या कलम २४ (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेली त्याची /तिची कर्तव्ये शिक्षक पाडतील, आणि

(आठ) शिक्षकाने/शिक्षिकेने खाजगी शिकवणीच्या कामात स्वत:ला गुंतवून घेऊ नये, याची सुनिश्चित शाळा करील.

**पुढील पानावर----**

८. शाळा समुचित प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या अभ्यासक्रामच्या आधारे तयार केलेल्या पाठयक्रमाचे पालन करील.

९. शाळा, अधिनियमाच्या कलम १९ मध्ये विहित केल्याप्रमाणे शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधांच्या तुलनेत विद्यार्थ्यांना प्रवेश देईल.

१०. शाळा अधिनियमाच्या कलम १९ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मानकांचे व प्रमाणकांचे पालन करील मागील तपासणीच्या वेळेत शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधा खालीलप्रमाणे होत्या :-

शाळेच्या परिसराचे ६११८.०० चौ.मी.

एकूण बांधकाम क्षेत्र :- २०१९.२६ चौ.मी.

खेळाच्या मैदानाचे क्षेत्रफळ :- ४०९८.७४ चौ.मी.

वर्गखोल्यांची संख्या- २०

कार्यालय-नि-भांडार-नि-मुखाध्यापकाची खोली

मुलांसाठी व मुलींसाठी स्वतंत्र प्रसाधनगृहे - जेथे वापरण्यासाठी व प्रसाधनगृहे स्वच्छ आणि आरोग्यदायी स्थितीत ठेवण्यासाठी पुरेसे पाणी असेल

पिण्याच्या पाण्याची सुविधा.

दुपारचे जेवण शिजविण्यासाठी स्वयंपाकघर

अध्यापन अध्ययन साहित्य/खेळ व क्रिडाविषयक सामग्री / ग्रंथालय यांची उपलब्धता

वाचन साहित्य विनासायास उपलब्ध

११. मान्यता नसलेले वर्ग किंवा तुकडया, शाळेच्या नावाने शाळेच्या परिसरात किंवा इतरत्र, चालविता येणार नाहीत.

१२. शाळेची इमारत किंवा इतर बांधकाम किंवा क्रिडांगण हे केवळ शिक्षणाच्या व कौशल्य विकासाच्या प्रयोजनार्थ वापरण्यात येतील.

१३. शाळा, सोसायटी नोंदणी अधिनियम, १८६० (१८ चा २१) किंवा मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियमक , १९५० अन्वये नोंदणी झालेल्या संस्थेमार्फत चालविण्यात येत आहे.

१४. शाळा कोणत्याही व्यक्तीच्या, गटाच्या किंवा व्यक्तीसंघाच्या किंवा इतर कोणत्याही व्यक्तीच्या फायद्याकरिता किंवा कोणत्याही नफा मिळविण्यासाठी चालविण्यात येत नाही

१५. शाळेचे लेखे सनदी लेखापालाकडून लेखापरिक्षण व प्रमाणित करुन घ्यावेत आणि नियमांनुसार योग्य लेखा विवरणपत्रे तयार करावीत. प्रत्येक लेखा विवरणपत्राची एक प्रत दरवर्षी जिल्हा शिक्षणाधिका-यांकडे पाठवण्यात यावी.

१६. तुमच्याशाळेला मिळालेला मान्यता संकेतांक RTEMMC 1DM-65 असा आहे, हा या कार्यालयाशी कोणताही पत्रव्यवहार करताना कृपया तो नमूद करावा, याची नोंद घ्यावी.

१७. शिक्षण संचालक / जिल्हा शिक्षणाधिकारी वेळोवेळी मागणी करतील असे अहवाल व माहिती शाळेने सादर करावे. किंवा शाळेच्या मान्यतेच्या शर्तीची निरंतर पूर्तता करण्यासाठी किंवा शाळेच्या कामकाजातील त्रुटी दूर करण्यासाठी शासन किंवा स्थानिक प्राधिकरण देईल अशा सुचनांचे पालन करावे.

१८. संस्थेच्या नोंदणीचे कोणतही असल्यास नूतनीकरण केल्याची सुनिश्चिती करावी.

१९. जोडपत्र तीन नुसार इतर शर्ती यासोबत जोडल्या आहेत.

२०. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ च्या कलम १८ व १९ तसेच शासन निर्णय क्र. एसएसए/२०१३/प्रक्र.७५/प्राशि ४ दि. २९.०६.२०१३ अन्वये शाळांमधील भौतिक सुविधांबाबत विहित करण्यात आलेल्या निकषांची पूर्तता होते किंवा कसे? याची अंतिम खात्री करण्याची जबाबदारी प्राथमिक शाळांच्या बाबतीत शिक्षणाधिकारी(प्राथमिक) यांची व माध्यमिक शाळांच्या बाबतीत **शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांची** राहिल.

२१. सदरची मान्यता प्रशासनाधिकारी **मनपा मालेगाव** यांचे शिफारशी अन्वये देण्यात येत आहे.

शिक्षणाधिकारी(प्राथमिक)
जिल्हा परिषद नाशिक

प्रत :- माहितीस्तव सविनय सादर,

१) मा. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य पुणे.

२) मा. शिक्षण उपसंचालक , नाशिक विभाग नाशिक